| | |
|---|---|
| **MHJN070014172025** | किरकोळ दि**.** अर्ज क्र**.** १५७/२०२५<br>गणेश **+९ ..** वि**..** निरंक |

## निशानी क्रमांक ०१ वर आदेश पारीत

## (आदेश दिनांक २१.०४.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेगुलेशन अधिनीयम १८२७ चे कलम २ व ३ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे करीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे संक्षिप्त कथन असे की, मयत शिवराम सखाराम सपकाळचे कायदेशीर वारस अर्जदार क्र. १ ते १० आहेत. अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील, क्र. ३ यांचे सासरे व क्र.४ ते १० यांचे आजोबा यांचा मृत्यु दि. १६.१०.२०१८ रोजी आंबोली, ता. कामरेज, जि.सुरत येथे झाला. तसेच मयताचा मुलगा व अर्जदार क्र.३ यांचे पती व अर्जदार क्र. ४ ते १० यांचे वडील रामसुंदर शिवराम सपकाळ यांचा मृत्यु दि. ११.०३.२००८ रोजी टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद, जि.जालना येथे झाला. तसेच मयत शिवराम यांची पत्नी आनंदाबाई शिवराम सपकाळ या मयत झालेल्या आहेत. मयताचे प्रस्तुत अर्जदारा व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांनी सदर अर्ज वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामाकरीता सादर केला आहे.

३. अर्जदारांच्या विनंतीस कोणाचा आक्षेप आहे का याबाबत न्यायालयाच्या आदेशान्वये 'दैनिक सकाळ' दिनांक २५.०१.२०२६ रोजी वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटण प्रसिध्द करण्यात आले ते नि.क्र. ९ वर आहे. परंतु आज पर्यंत सदर प्रकरणामध्ये कोणाचाही आक्षेप/उजर प्राप्त झाला नाही.

४. प्रस्तुत अर्जामधील कथनांच्या पृष्ठयार्थ अर्जदार क्र. १ यांनी नि.क्र. ८ वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदारांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात अर्जातील कथनांचा तंतोतंत समावेश केला आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या नि.क्र. १० व ११ नुसार मयतांचे मृत्यु प्रमाणपत्र, नि.क्र. १२ नुसार सरपंच ग्रामपंचायत कार्यालय टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद, जि.जालना यांनी दिलेले वारस प्रमाणपत्र, तसेच कागद यादी नि.क्र. ४/१ ते नि.क्र. ४/१० नुसार अर्जदारांचे आधार कार्डची प्रत दाखल केली आहे. तसेच नि.क्र. १३ अन्वये पुरसीस सादर करुन

त्यांचा पुरावा बंद केला.

**५.** अर्जदारांच्या पुराव्यास कोणीही आवाहन दिले नसल्यामुळे अर्जातील कथनावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता तसेच अद्याप कोणाचा आक्षेप नसल्यामुळे वरील अर्जदार हे वारस असल्याचे ग्राहय धरण्यास हरकत नाही. तसेच अर्जदाराचे मयताशी असलेले नाते संबंध विचारात घेता, वरील अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. तसेच त्यांना औपचारीक मान्यता देण्यास बाधा नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचीत आहे. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१. गणेश शिवराम सपकाळ, क्र.२. साळुबाई शेषराव धनवई, क्र.३. मथुराबाई रामसुंदर सपकाळ, क्र.४. रेखा रामदास धनवई, क्र.५. लता रामेश्वर तबडे, क्र.६. स्वाती बाळुराम तबडे, क्र.७. सिमा संदीप तबडे, क्र.८. पुजा मनोज कोल्हे, क्र.९. सचिन रामसुंदर सपकाळ व क्र.१०. सागर रामसुंदर सपकाळ हे **मयत शिवराम सखाराम सपकाळ** यांचे वारस असल्याचे घोषित करण्यात येते व सदरचा वारसा दाखला देण्यात येतो.

३. दिवाणी पुस्तीका प्रकरण क्र. १४ मधील परीच्छेद क्रमांक ३१२ अन्वये मुळ वारस प्रमाणपत्रावर टिप नमुद करावी.

४. अर्जदार यांना आवश्यक मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर )

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AMIT NARENDRA KHATADE
Date: 2026.04.21 16:22:01 +0530

दिनांक – २१.०४.२०२६

(ए.एन.खताडे)
दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर,
जाफ्राबाद.

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द नि शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

दिनांक – २१.०४.२०२६

स्वाक्षरित/–
(अहमद शेख)
लघुलेखक.